# महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ,नाशिक

**Maharashtra University of Health Sciences, Nashik**

वणी - दिंडोरी रोड, म्हसरुळ, नाशिक - ४२२००४.

Vani – Dindori Road, Mhasrul, Nashik – 422 004.

**EPABX :** 0253-2539100-300, **Phone :** 0253-2539172, 2539111

**E-mail :** sw@muhs.ac.in **Web.:**www.muhs.ac.in

**संदिप श्रीराम कुलकर्णी**
(बी.एस.एल., एल.एल.बी., एम.पी.ए, पी.जी.डी.एच. आर )
**प्र. संचालक, विद्यार्थी कल्याण**

**Sandip Shriram Kulkarni**
(B.S.L, LLB., MPA,P.G.D.H.R)
**Offg.Director, Student Welfare**

मआविवि/एसडब्ल्यू/स्पोर्ट्स/ ११०७ /२०२१ दि.०८/११/२०२१

## परिपत्रक क्र. २५ / २०२१

### सर्वोत्कृष्ट शिक्षक, क्रीडा शिक्षक, सर्वोत्कृष्ट विद्यार्थी व खेळाडु विद्यार्थी पुरस्कारांची घोषणा

विद्यापीठाशी संलग्नीत महाविद्यालयातील शैक्षणिक तसेच इतर विविध उपक्रमांमध्ये गुणवत्तापुर्ण कामकाज करणाऱ्या शिक्षक, क्रीडा शिक्षक, विद्यार्थी व खेळाडु विद्यार्थी यामधुन सर्वोत्कृष्ट शिक्षक, सर्वोत्कृष्ट विद्यार्थी, सर्वोत्कृष्ट क्रीडा शिक्षक तसेच सर्वोत्कृष्ट खेळाडू विद्यार्थी यांची निवड करण्यात येत असते.

तथापि, कोव्हीड-१९ या संसर्गजन्य आजाराच्या प्रसारामुळे शासनाने लागु केलेल्या निर्बधांमुळे विद्यापीठ प्रशासनाने सन २०१९-२० या कालावधीतील सदर पुरस्कारांची कार्यवाही स्थगित केली होती. कोव्हीड - १९ या संसर्गजन्य आजाराची सध्यास्थिती विचारात घेऊन राज्य शासनाने निर्बध काही प्रमाणात शिथील केल्यामुळे विद्यापीठ प्रशासनाने सन २०१९-२० व सन २०२०-२१ या कालावधित सर्वोत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या शिक्षक व विद्यार्थ्यांना पुरस्कृत करण्याचे प्रस्तावित केले होते.

त्याअनुषंगाने, विद्यापीठाव्दारे सलंग्नीत महाविद्यालयांकडून प्रस्ताव मागविण्यात आले व प्राप्त प्रस्तावांवर मा.कुलगुरु यांच्या आदेशान्वये गठीत करण्यात आलेल्या निवड समितीमार्फत निवड करण्यात आलेल्या उमेदवारांची दि. २०/१०/२०२१ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेनंतर खालील प्रमाणे सर्वोत्कृष्ट शिक्षक, सर्वोत्कृष्ट विद्यार्थी, तसेच सर्वोत्कृष्ट खेळाडू विद्यार्थी पुरस्कारांकरीता निवड झालेल्या शिक्षक/विद्यार्थ्यांची (पोलीस यंत्रणेमार्फत चारीत्र्य पडताळणीचे अधीन राहुन) याद्वारे घोषणा करण्यात येत आहे.

## सर्वोत्कृष्ट शिक्षक पुरस्कार :

| अ.क्र. | विद्याशाखा | पुरस्कारार्थीचे नाव | महाविद्यालयाचे नाव |
|---|---|---|---|
| १ | वैद्यकीय | डॉ. संदिप सिताराम कडू | डॉ. विविपीएफ वैद्यकीय महाविद्यालय, अहमदनगर |
| २ | आयुर्वेद | डॉ. अनंतकुमार वसंत शेकोकर | एस.व्ही.एन.एच.टी आयुर्वेद महाविद्यालय, अहमदनगर |

## सर्वोत्कृष्ट विद्यार्थी पुरस्कारः

| अ.क्र. | विद्याशाखा | पुरस्कारार्थीचे नाव | महाविद्यालयाचे नाव |
|---|---|---|---|
| १ | वैद्यकीय | कु. उल्फत इमरान परदेशी | डॉ. वसंतराव पवार वैद्यकीय महाविद्यालय, नाशिक |
| २ | आयुर्वेद | कु. शुभम रामनारायण धुत | टिळक आयुर्वेद महाविद्यालय, पुणे |
| ३ | होमिओपॅथी | कु. प्रशांत नरेश पाटील | एम.एच.एफ होमिओपॅथीक महाविद्यालय, संगमनेर |
| ४ | नर्सिंग | कु. अंजु मारीमुथु | श्रीमती एस.पी गंभीरचंद नर्सिंग महाविद्यालय, मुंबइ |

## सर्वोत्कृष्ट विद्यार्थी (क्रीडा) पुरस्कारः

| अ.क्र. | विद्याशाखा | पुरस्कारार्थीचे नाव | महाविद्यालयाचे नाव |
|---|---|---|---|
| १ | दंत | कु. कृष्णप्रिया प्रविण गट्टाणी | के.बी.एच दंत महाविद्यालय, नाशिक |
| २ | आयुर्वेद | कु. दामिनी पुंडलीक बागुल | एल.आर.पी आयुर्वेद महविद्यालय, इस्लामपुर |
| ३ | भौतिकोपचार | कु. शौनक सुनिल प्रसादे | पि.ई.एस मॉर्डन कॉलेज ऑफ फिजिओथेरेपी, पुणे |

सर्वोत्कृष्ट क्रीडा शिक्षक पुरस्कारांकरीता तसेच काही विद्याशाखांमधुन सर्वोत्कृष्ट शिक्षक, सर्वोत्कृष्ट विद्यार्थी व सर्वोत्कृष्ट विद्यार्थी (क्रीडा) या पुरस्कारांकरीता पात्रतेचे निकष पुर्ण होत नसल्यामुळे कुणीही शिक्षक / विद्यार्थी पात्र ठरलेला नाही. उपरोक्त निवड झालेल्या शिक्षक व विद्यार्थी तसेच त्यांचे महाविद्यालयांचे विद्यापीठातर्फे हार्दिक अभिनंदन! सदर पुरस्कार्थींना पुरस्कार प्रदान करण्याबाबतची कार्यवाही मा. कुलगुरु यांच्या आदेशानुसार लवकरच विद्यापीठाच्या संकेतस्थळावर जाहीर करण्यात येईल.

धन्यवाद.

**प्र.संचालक,**
**विद्यार्थी कल्याण**